# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१७२१/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.रमेश दशरथ वाघ,<br>रा.C/O डॉ. अनिल एच.गुजराथी,<br>प्रशांत नर्सिंग होम, पारोळा,<br>ता.पारोळा, जि.जळगाव-४२५१११ | सहाय्यक अभियंता(श्रेणी-२),<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>पारोळा, ता.पारोळा, जि.जळगाव. | सहाय्यक अभियंता(श्रेणी-१),<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>पारोळा, ता.पारोळा, जि.जळगाव. |

**सुनावणी दिनांक —२१/०७/२०२५**

**१. उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ३१/०३/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : दि.२२/१२/२०२२ च्या अर्जातील मद्दा क्र.१ ची अपूर्ण माहिती दिली व मुद्दा क्र. २ ची माहिती दिली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : अपिल अधिकारी यांना अपिल नियम १९ कलम ६ चा भंग केला आहे तरी शास्ती नियम २०(१)(२) अन्वये कारवाई व्हावी- सेवा नियमान्वये शिस्तभंगाची कारवाई व दंडात्मक कारवाई व्हावी ही विनंती.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २२/१२/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २३/१२/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : ------

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** न.पा.पारोळा कडील ठराव क्र.५१ दि ०४/१२/२०२० च्या जनरल सभेच्या ठरावाच्या प्रतित नमुद कामाबाबत. १) सदर ठरावानुसार आपल्या कार्यालयाने केलेल्या १२ मी (डि.पी.) रस्ता जाधवसाहेबाचे घर ते संजु वाणीचे घरा पर्यंतचा (डिपी रस्ता) ठरावा प्रमाणे मोजणी बाबत दस्तऐवज व अंतिम मोजणी सिटची प्रत मिळावी. अ) तसेच त्या कामाबाबतचे बजेट व प्लॅन एस्टीमेटची प्रत, ब) सदर कामाच्या Workorder वर्क ऑर्डरची प्रत मिळावी. क) सदर कामाच्या तपासणी अहवालाची प्रत, ब पूर्णत्वाचा दाखला प्रत मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(श्रेणी-२), सा.बा.उपविभाग पारोळा, यांनी दि.१४/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये आपण या उपविभागास सादर केलेल्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहितीची मागणी केलेली आहे. अनेक विषयांपैकी आपणास एक विषयाची माहिती म्हणजे (कामांचे इस्टीमेट व वर्क ऑर्डर) या उपविभागा मार्फत आपणास विनामुल्य पुरविण्यात येत आहे. असे अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येते.

४. प्रथम अपील -

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २७/०१/२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २७/०१/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मागणी अर्जाची दखल घेतली नाही नियमान्वये माहिती पुरविली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांनी सादर केलेल्या प्रथम अपिल अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(श्रेणी-१), सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पारोळा, ता.पारोळा, जि.जळगाव. यांनी दि.११/०२/२०२२ रोजी सुनावणी आयोजित केल्याचे दिसून येते मात्र प्रथम अपिल आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा** –

अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान आयोगास कोणताही लेखी युक्तीवाद सादर केल्याचे दिसून येत नाही.

६. **निष्कर्ष** –

(१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(श्रेणी-२), सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पारोळा, ता.पारोळा, जि.जळगाव. यांनी दि.१४/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये एका विषयाची उपलब्ध माहिती दिल्याचे दिसून येते.

(२) अपिलार्थी यांनी आयोगास लेखी अर्जान्वये असे कळविले आहे की, त्यांना अर्जंट फोन आल्यामुळे गावी परत जाणे अत्यावश्यक असल्याने सुनावणीस हजर राहणे शक्य नाही. तथापि द्वितीय अपिलात त्यांनी मुद्दा क्र.१ ची माहिती अपूर्ण मिळाली व मुद्दा क्र.२ ची माहिती मिळाली नाही अशी कारणे नमूद केलेली आहेत.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(श्रेणी-२), सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पारोळा, ता.पारोळा, जि.जळगाव. यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २२/१२/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती / वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव, ता.जि.जळगांव, यांना आदेशीत करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(श्रेणी-१), सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पारोळा, ता.पारोळा, जि.जळगाव. यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन, आदेश पारीत न करुन अधिनियमातील कलम १९(६) तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ) दि.१२/१२/२००७ मधील तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्याची खातरजमा झाल्यास त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ दि.३१/०३/२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

३) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.१७२१/२०२२/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ८८९८

18 NOV 2025